**तातडीचे / काळमर्यादा**

क्र.पोमसं/१/IPS-ACR-Annu.Incre.July-17/१७२/२०१७,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई -४०० ००१.
दिनांक ०५/०५/२०१६.

**संदर्भ :-** शासन पत्र, गृह विभाग, क्र. वेतन ०११७/प्र.क्र.१/भापोसे कक्ष, दि. २६ एप्रिल, २०१७.

**विषय :-** भापोसे अधिका-यांच्या माहे जुलै, २०१७ मध्ये देय वार्षिक वेतनवाढी मुक्त करण्यासाठी गोपनीय अहवालांचे प्रतिवेदन व पुनर्विलोकन करण्याबाबत.

***

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, संदर्भाधिन शासन पत्रान्वये महाराष्ट्र संवर्गातील भापोसे अधिका-यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचा-यांचे सन २०१६-१७ या वर्षाचे स्वयंमुल्यांकन निर्धारण अहवाल / गोपनीय अहवाल यथास्थितीत प्रतिवेदित / पुनर्विलोकित / स्विकृत करून सादर केले आहेत, **याबाबतचे प्रमाणपत्र शासनास दिनांक ३० जून २०१७ पुर्वी पत्राद्वारे, तसेच ई-मेलवर (home_ips@maharashtra.gov.in) पाठविण्याबाबत निर्देश दिले आहेत.** तरी सर्व विभाग प्रमुखांना सूचित करण्यात येते की, त्यांनी आवश्यकतेनुसार सदर ज्ञापनाची प्रत, सहपत्रांसह पोलीस वेबसाईटवरुन उपलब्ध करुन घ्यावी, व तशा सूचना त्यांच्या अधिनस्थ भापोसे अधिका-यांना कळवाव्यात.

२. सदर प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यन्त संबंधीत भापोसे अधिका-यांना **दि. ०१ जुलै, २०१७ रोजी देय होणारी वार्षिक वेतनवाढ शासनाकडून मंजूर करण्यात येणार नाही,** याची कृपया नोंद घ्यावी.

३. तरी शासन पत्रात दिलेल्या निर्देशांनुसार आवश्यक ते **"प्रमाणपत्र" शासनास तातडीने सादर करुन, त्याची एक प्रत ह्या कार्यालयास** (कार्यासन क्रमांक-१ ला लक्षवेध करुन) **माहिती व अभिलेखासाठी सादर करावी.**

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्था.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचेकरिता.

**जोडपत्र : वरिलप्रमाणे**

**प्रति,**

सर्व भापोसे अधिकारी.

**प्रत :-** पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, मुंबई.

२/- सदर पत्र, सहपत्रासह पोलीस दलाच्या संकेत स्थळावर तीन महिने प्रसिध्द करावा.

## महाराष्ट्र शासन

तात्काळ

0 6 2 0
28 APR 2017
62327/17
1 3 9

क्र. वेतन ०११७/प्र.क्र.१/भापोसे कक्ष
गृह विभाग, दुसरा मजला, मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०४८३२१.
ई-मेल: home_ips@maharashtra.gov.in
दिनांक- २६ एप्रिल, २०१७.

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय— भापोसे अधिकाऱ्यांच्या माहे जुलै, २०१७ मध्ये देय वार्षिक वेतनवाढी मुक्त करण्यासाठी गोपनीय अहवालांचे प्रतिवेदन व पुर्नविलोकन करण्याबाबत.

संदर्भ - १.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सीएफआर-१२११/ प्र.क्र.२१७/तेरा, दि. १७.१२.२०११
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१०१३/प्र.क्र.५५/कोषा प्र-५, दि. ०९.०७, २०१३

उपरोक्त क्र. १ येथील शासन निर्णयान्वये अखिल भारतीय सेवेतील व राज्य शासनाच्या सेवेतील अधिकारी / कर्मचा-यांचे गोपनीय अहवालांचे प्रतिवेदन व पुर्नविलोकन करण्यासाठी कॅम्प आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. ४(१०) मध्ये प्रतिवेदन व पुर्नविलोकनाचे २ कॅम्प आयोजित केल्यानंतर देखील जे प्रतिवेदन अधिकारी व पुर्नविलोकन अधिकारी त्यांच्याकडील गोपनीय अहवालाचे प्रतिवेदन / पुर्नविलोकनाचे काम पूर्ण करणार नाहीत, अशा अधिकाऱ्यांना दरवर्षी दि. १ जुलै रोजी देय होणारी वार्षिक वेतनवाढ असे काम पूर्ण करण्याच्या दिनांकापर्यंत मंजूर करण्यात येऊ नये असे नमूद करण्यात आले आहे.

उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र संवर्गातील भापोसे अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्थ अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वर्ष २०१६-१७ पर्यन्तचे गोपनीय अहवाल यथास्थितीत प्रतिवेदित / पुर्नविलोकित / स्वीकृत करुन सादर केले आहेत याबाबतचे प्रमाणपत्र शासनास दि. ३० जून, २०१७ पूर्वी पत्राव्दारे तसेच ई-मेलवर (home_ips@maharashtra.gov.in) पाठविण्याबाबत संबंधित भापोसे अधिकाऱ्यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे. सदर प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यंत संबंधित भापोसे अधिकाऱ्यांना दि. १ जुलै, २०१७ रोजी देय होणारी वार्षिक वेतनवाढ मंजूर करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

(तुषार महाजन)
अवर सचिव, गृह विभाग.

Z:\२०१७\Increment २०१७\Increament Noting & lettter २०१७.docx